Golden Research thoughts
Volume 2, Issue. 1, July 2012
**ISSN:-2231-5063**

Available online at www.aygrt.net

ORIGINAL ARTICLE

# *महाराष्ट्रातील नागरी बॅंकांची कार्यक्षमता विशेष संदर्भात सारस्वत सहकारी बॅंक*

*शिवाजी काकासाहेब तौर[1] , आर.एस. सोळुंके[2]*

[1]साहायक प्राध्यापक, (अर्थशास्त्र) मस्त्योदरी महाविद्यालय, जालना
[2]अर्थशास्त्र विभाग प्रमुख, डॉ. बा.आ.म. विद्यापीठ औरंगाबाद
tsrajeshivaji05@gmail.com

### *प्रस्तावना :—*

सर्व सामान्य आर्थिक परिस्थीती असलेल्या लोकांना आर्थिक मदत करण्यासाठी स्थापन झालेल्या नागरी भागातील नागरी सहकारी बॅंकाकडुन सभासदांना व इतरांना कर्जरूपाने पैसा उपलब्ध करून दिला जातो या बॅंकां हे कर्ज विविध कारणांसाठी देत असतात नागरी भागातील लोकांच्या कर्ज विषयक गरजा पुर्ण करून नागरी सहकारी बॅंका नागरी भागातील लोकांचा आर्थिक विकास घडवुन आणण्यात महत्वाच्या भुमिका बजावतात त्यामुळे राष्ट्राचा देखील विकास होण्यास मोठया प्रमाणात या बॅंका हातभार लावीत असतांना दिसत आहेत. मोठया प्रमाणात कर्जदारांसाठी व्यापारी बॅंका ज्या सेवा पुरवितात त्या सेवा लहान घटकांसाठी नागरी सहकारी बॅंकांनी पुरवण्यात आणि राष्ट्राच्या विकासात आपले महत्वपुर्ण स्थान टिकवुन ठेवावे या साठी नागरी बॅंकांचा अभ्यास महत्वाचा आहे.

महाराष्ट्रामध्ये सद्य स्थितीला (2009) 586 नागरी सहकारी बॅंका कार्यरत होत्या ज्यांचा सार्वजनिक क्षेत्रातील बॅंकांच्या तुलनेत अल्प हिस्सा आहे आज महाराष्ट्रातील नागरी बॅंकाची स्थीती दयनिय होत आहे ज्यामध्ये जाचक असे कायदे,वाढता राजकिय हस्तक्षेपामुळे त्यांचा दर्जा खालवला आहे त्यामुळे नागरी सहकारी बॅंकांविषयी स वातावळा निर्माण होत आहे

असे असेल तरी शासणाच्या नियमांच्या अधिन राहून देखिल सहकारी बॅंक जर योग्य पध्दतीने स्थयी हितसंबंध कपुनीचे राजकारण आदी पासून दुर ठेवुन चालविली तर ती वैभवाप्रत पोचते आणि यशस्वी होते हे आपल्या कार्यातुन सारस्वत सहकारी बॅंकेने दाखवन दिले आहे. त्यामूळेच सारस्वत सहकारी बॅंक ही भारतामध्ये सहकारी तत्वावर चालणारी प्रथम क्रमांची बॅंक आहे त्यामूळे अभ्यासासाठी सारस्वत बॅंकेची निवड केले आहे.

सारस्वत नागरी सहकारी बॅंक ही सन 1918साली मुंबई येथे स्थापन झाली बॅंकेच्या स्थापनेपासून बॅंकेने सातत्याने आपला विस्तार केला आहे. सन 1991 नंतर आधुनिकीकरणाच्या काळात बॅंकेने आपले स्थान भक्कम बनवले आहे

### *अध्ययनाची उदिष्ठे:—*

1) निवडक निर्देशकाच्या आधारे सारस्वत बॅंकेच्या कार्यक्षमतेचा अभ्यास करणे.
2) बॅंकेच्या अनुत्पादीत कर्जाच्या स्थितीचा अभ्यास करणे.

### *संशोधन पध्दती :—*

प्रस्तुत शोध निबंधासाठी व्दितीय साधन सामग्रीचा आधार घेण्यात आला आहे त्यासाठी सहकारी महाराष्ट्राचे विविध अंक, सारस्वत बॅंकेचे वार्षीक अहवाल, इंटरनेट, दैनीक इत्यादी सारख्या दुय्यम साधन सामग्रीचा आधार घेण्यात आला आहे. दुय्यम सामग्रीच्या विष्लेशनासाठी सांखीकीय साधानाचा आधार घेण्यात आला आहे त्याच प्रमाणे वित्तीय कामगीरीच्या अभ्यासासाठी प्रमाण (गूणोत्तर) पद्धतीचा आधार घेण्यात आला आहे.

**Please cite this Article as :** *शिवाजी काकासाहेब तौर[1] , आर.एस. सोळुंके[2]* ,*महाराष्ट्रातील नागरी बॅंकांची कार्यक्षमता विशेष संदर्भात सारस्वत सहकारी बॅंक* **: Golden Research Thoughts (July; 2012)**

<u>सुत्र</u>

$$\text{बॅक निर्देशक} = \frac{\text{निर्देशकासंबंधी प्रथम संख्या}}{\text{निर्देशकासंबंधी व्दितीय संख्या}} \times 100$$

***महाराष्ट्रातील नागरी बॅंकाची स्थिती:–***

सहकारी बॅक चळवळ खऱ्या आर्थाने महाराष्ट्रात विकसीत झाली त्यामध्ये कालावधीनुसार बदल होत गेले खालील तकत्यामध्ये महाराष्ट्रातील नागरी बॅकाच्या स्थितीचा अभ्यास केला आहे.

***तक्ता क.1***
***महाराष्ट्रातील नागरी बॅकाची स्थिती (1991–2009)***

| वर्ष | १९९१ | २००१ | २००९ |
|---|---|---|---|
| बॅकसंख्या | ३८५ | ६३२ | ५८६ |
| ठेवी | ४९०६८२ | २९०१६४२ | ८८२७६८८ |
| कर्ज | ३८३५१५ | १९३३६६३ | ५९०१६५९.११ |
| नफा | ७३३६ | ३२४५९ | १०८१२२.९ |

स्त्रोत:–' महाराष्ट्रातील सहकारी चळवळ एक दृष्टीक्षेप, 2007 सहकार आयुक्तालय पुणे.

वरील तक्ता क. 1 मध्ये महाराष्ट्रातील नागरी बॅकाच्या प्रगतीचा आढावा निवडक घटकांच्या आधारे घेण्यात आला आहे.

सन 1991 मध्ये महाराष्ट्रात 385 बॅंका कार्यरत होत्या त्यामध्ये 632 बॅंका एवढी वाढ सन 2001 मध्ये झाली. मात्र सन 2009 मध्ये बॅक संख्येत 586 बॅका पर्यत घट झाली होती.

बॅकेच्या ठेवी सन 1991 मध्ये 490682 लक्ष होत्या त्यामध्ये सन 2009 मध्ये 8827688 लक्ष रूपये वाढ झाली. तर सन 1991 मध्ये असनारी 383515 लक्ष रू.ची कर्जे सन 2009 मध्ये 5901659 लक्ष रू. एवढी वाढली मात्र सन 1991 च्या तुलनेत नागरी बॅंकाचे ठेवीचे कर्जामध्ये रूपांतर करण्याचे प्रमाण सन 2009 मध्ये कमी होते. महाराष्ट्रातील नागरी बॅकाचा नफा सन 1991 मध्ये 7336 लक्ष होता. त्यामध्ये सन 2001 मध्ये 32459 तर सन 2009 मध्ये 108122.9 एवढी वाढ झाली.

एकदर महाराष्ट्रातील नागरी बॅंकाच्या प्रगतीचा अभ्यास केला असता सन 2001 नंतर नागरी बॅक संख्येत घट झाली त्यांच्या ठेवी, कर्ज, नफा या घटकात वाढ झाली मात्र एकदर प्रगती माफक राहीली आहे.

***सारस्वत बॅकेची वित्तीय स्थिती:–***

सारस्वत नागरी सहकारी बॅक ही सन 1918 साली मुंबई येथे स्थापन झाली बॅकेने सन 1991 नंतर देखील आपले वित्तीय स्थान भक्कम बनवले आहे त्यामुळेच सारस्वत बॅक भारतामध्ये प्रथम कमांकावर आहे बॅक आपल्या वित्तीय घटकामध्ये अत्यत सक्षम आहे त्यामुळे बॅंकेची अभ्यासासाठी निवड केली आहे. बॅकेच्या वित्तीय स्थितीचा अभ्यास खालील घटकाच्या आधारे केला आहे.

***1) तरलता प्रमाण:–***

नागरी सहकारी बॅकांना आपली विस्वासार्हता ही आपल्या दैनंदीन व्यवहारातून संपादन करावी लागते आणि बॅकेच्या विस्वासार्हतेवरच बॅकेची यशस्वीता अवलंबून असते नागरी बॅकाना 3 ते 6 टक्के रक्कम तरल स्वरूपात ठेवणे बंधनकारक आहे रोख रकमेव्दारे बॅकांना ठेवीदाराना मागता क्षणी पैसे परत करता येतात ज्यामुळे सभासद, ग्राहक यांचा विश्वास संपादन करता येतो.

$$\text{रोख राखीव निधी} = \frac{\text{रोख निधी}}{\text{चालु व मुदती देयता}} \times 100$$




*संदर्भः–*सारस्वत सहकारी बँकेचे संबंधित वर्षाचे वार्षिक अहवाल 1991 ते 2009

आलेख क. 1 मध्ये सारस्वत सहकारी बँकेचे रोख राखीव निधी प्रमाण दर्शवीले आहे. सन 1991–92 ते 2008–09 या कालावधीमध्ये रोख राखीव निधी प्रमाण सरासरी 10.30 टक्के होते सारस्वत बँकेचे रोख राखीव निधी प्रमाण कमीत कमी 6.93 टक्के तर जास्तीत जास्त 15.64 टक्के च्या दरम्यान होते. नागरी बँकाना जास्तीत जास्त प्रमाण 6 टक्के ठेवणे आवश्यक असताना बँकेन सरासरी 10.30 राखले जे बँकेच्या भविष्यातील व्यवहारासाठी आणि बाजारातील आपली पत टिकवण्यासाठी योग्य होते रोख राखीव निधी प्रमाण बँकेने अभ्यास काळात योग्य ठेवले त्यामुळे बँकेला तरलता समस्येला सामोरे जावे लागले नाही.

*2) नफा क्षमताः–*

नफा क्षमता ही बँकेच्या कमाईची आणि व्यवहारात टिकून राहण्याची महत्वाची कसोटी आहे. बँक नफ्यामध्ये चालवली तर बँकेला आपल्या कर्जातील उणीवा, कच्चे दुवे उघड होतात त्यामुळे बँकांना योग्य ग्राहकाकडे लक्ष पुरवून आपल्या व्यवहारात वाढ करता येते.

निव्वळ नफा आणि एकूण संपत्तीचे प्रमाण हे बँकेच्या संपत्तीचा उपयोग करून नफा निर्मीतीची क्षमता दर्शविते.

$$\text{नफा क्षमता} = \frac{\text{निव्वळ नफा}}{\text{एकूण संपत्ती}} \times 100$$




*संदर्भः–*सारस्वत सहकारी बँकेचे संबंधित वर्षाचे वार्षिक अहवाल 1991 ते 2009

तक्ता क्र. 2 मध्ये निव्वळ नफा आणि एकूण संपत्तीचे प्रमाण दर्शविले आहे सन 1991–92 ते 2008–09 या अभ्यास कालावधी मध्ये निव्वळ नफा आणि एकूण संपत्तीचे प्रमाण हे सरासरी 0.75 टक्के होते. सन 1991–92 व 1992–93 या सुरवातीच्या दोन वर्षामध्ये सारस्वत बँकेचा निव्वळ नफा आणि एकूण संपत्तीचे प्रमाण सरासरीच्या जवळपास होते. सन 1999–00 पासून प्रमाणात अल्प वाढ होतानां दिसून येते. सन 2003–04 मध्ये प्रथमतः हे प्रमाण 1 टक्केच्या वर गेल्याचे दिसते. सन 2004–05 चा अपवाद वगळता प्रमाण 1 टक्केच्या वर राहीले आहे म्हणजेच बँक आपल्या एकूण संपत्तीचा पर्याप्त वापर करून आपली नफा क्षमता वाढवत असल्याचे स्पष्ट होते.

### *3) प्रती कर्मचारी व्यवहार :–*

बँकेच्या प्रत्येक कर्मच्या-यामागे बँकेचा व्यवहार हे प्रमाण बँक कर्मच्या-याची कार्यक्षमता नफा क्षमता आणि उत्पादकता दर्शवीते. सध्याच्या स्पर्धात्मक यूगात कर्मच्या-याची कार्य क्षमता सातत्यपूर्ण ठेवण्यावर बँकांचा कल असतो. वेगवेगळया प्रशिक्षण कार्यक्रमाव्दारे कर्मच्या-याची कार्यक्षमता अद्यावत ठेवण्याचा प्रयत्न केला जातो.

$$\text{प्रतिकर्मचारी व्यवहार} = \frac{\text{एकूण व्यवसाय}}{\text{एकूण कर्मचारी}}$$




आलेख क्र.३
प्रति कर्मचारी व्यवसाय प्रमाण

संदर्भः–सारस्वत सहकारी बँकेचे संबंधित वर्षाचे वार्षिक अहवाल 1991 ते 2009

तक्ता क्र. 3 मध्ये सारस्वत बँकेच्या प्रत्येक कर्मच्या-यामागे असणारे व्यवसाय प्रमाण (ठेवी कर्ज) हे सातत्याने वाढत असल्याचे दिसून येते सन 1991–92 मध्ये प्रत्येक कर्मच्या-यामागे 45 लाख रू.इतका असणारा व्यवसाय सन 2008–09 पर्यत सातत्याने वाढत जावुन 724 लाख रूपये एवढा प्रचंड वाढला होता. म्हणजेच सारस्वत बँकेने आपल्या कर्मच्या-यांची कार्यक्षमता फक्त टिकवूनच न ठेवता त्यामध्ये प्रचंड वाढ करण्यात यश मिळवले होते.

### *4) संपत्ती प्रमाण :–*

कोणत्याही बँकेच्या संपत्तीची स्थिती हा बँकेच्या क्षमता आणि कार्यक्षमतेच्या मापनाचा महत्वाचा घटक आहे संपत्ती परीमान हे एकूण कर्जाचे अनुत्पादीत कर्जाशी असणारे प्रमाण स्पष्ट करते. नरसीहम कमीटीनुसार बँकाना हे प्रमाण 9 टक्के राखणे आवश्यक आहे. या प्रमाणवरून बँक कोणत्या प्रकारच्या ऋणको बरोबर व्यवहार करते, कीती संपत्ती अनुत्पादीत आहे. हे देखील स्पष्ट होते. एकूण कर्जाचे उनुत्पादीत कर्जाचे असणारे प्रमाण बँकेची वसूली क्षमता, पतपुरवढा क्षमता, सापत्तीक स्थिती इत्यादी घटकाचे मापण करते.

$$\text{संपत्ती प्रमाण} = \frac{\text{निव्वळ अनुत्पादीत मत्ता}}{\text{एकूण कर्ज}} \text{X100}$$




संदर्भः—सारस्वत सहकारी बॅकेचे संबंधित वर्षाचे वार्षिक अहवाल 1991 ते 2009

तक्ता क्र. 4 मध्ये सारस्वत सहाकरी बॅकेचे निव्वळ अनुत्पादीत मत्तेचे एकूण कर्जाशी असणारे प्रमाण स्पष्ट करण्यात आले आहे. सन 1996—97 ते 2008—09 कालावधीमध्ये सरासरी प्रमाण 3 टक्के होते. सारस्वत सहकारी बॅकेचे निव्वळ अनुत्पादीत मत्ताचे एकूण कर्जाशी असणारे प्रमाण सन 1997—98 मध्ये सर्वात जास्त 6.35 टक्के तर सर्वात कमी प्रमाण सन 2004—05 ते 2008—09 या कालावधी मध्ये शुन्य टक्के होते. निव्वळ अनुत्पादीत मत्ता आणि एकूण कर्जाचे प्रमाण मागील पाच वर्षाच्या काळात शुन्य टक्के राहीले होते. यावरून सारस्वत सहकारी बॅकेची कर्जवाटप आणि कर्ज वसूली कार्यक्षम पणे होत होती व बॅकेच्या संपत्तीचा दर्जा गुणात्मक होता.

***सारांश :—***

अशा प्रकारे सारस्वत सहकारी बॅकेने नागरी बॅकासाठी असणारी रिझर्व बॅकेची बंधने,योग्य व्यवस्थापन, उत्कृष्ट नेतृत्व आणि कार्यक्षम कर्मचारी वर्ग इत्यादीच्या आधारे आपली उच्च कार्यक्षमता सिध्द केली आहे. सध्य स्थितीला नागरी बॅकाची वाढत चालेली अविश्वासार्हता, भ्रष्टाचार, दिवाळखोरी इत्यादी असताना देखील सारस्वत बॅकेने दाखवून दिले आहे की, सहकाराच्या आधीन राहून निष्ठेणे बॅक चालवली तर ती नक्कीच यशस्वी होते. त्यामुळे सारस्वत बॅक नागरी बॅकासाठी आदर्श होवु शकते.

***निष्कर्षः—***

1.महाराष्ट्रातील नागरी बॅकांच्या प्रगतीचा अभ्यास केला असता सन 2001 नंतर नागरी बॅकाच्या संख्येत घट झाली आहे.
2.महाराष्ट्रातील नागरी बॅकांच्या एकूण ठेवी, कर्जे, नफा आदी घटकामध्ये वाढ झाली असली तरी एकंदर प्रगती मापक राहीली आहे.
3.सारस्वत सहकारी बॅकेची स्थापना 14 संप्टेबर 1918 रोजी मुंबई येथे झाली. बॅकेने आपल्या स्थापनेपासून कार्यक्षमतेत वाढ केली आहे.
4.सन 1991—92 ते 2008—09 या कालावधीमध्ये सारस्वत बॅकेचे तरलता प्रमाण सरासरी 10.30 टक्के होते बॅकेने रोख राखीव निधी प्रमाण सातत्यपूर्ण ठेवले त्यामुळे बॅकेला तरलता समस्येला सामोरे जावे लागले नाही म्हणजेच बॅकेने ग्राहकांचा विश्वास संपादन केला आहे.
5.सन 1991—92 ते 2008—09 काळाचा अभ्यास केला असता बॅकेने निव्वळ नफा आणि एकूण संपत्ती प्रमाण सरासरी 0.75 टक्के ठेवले आणि अभ्यास काळाच्या शेवटी सन 2008—09 मध्ये प्रमाणात 1.2 टक्के पर्यत वाढ केली म्हणजेच बॅक आपल्या नफाक्षम घटकांचा कार्यक्षम उपयोग करत होती.
6.सारस्वत बॅकेच्या प्रत्येक कर्मच्याऱ्यामागे असणारे व्यवसाय प्रमाण सन 1991—92 मध्ये 45 लाख रू. एवढे होते त्यामध्ये सातत्याने वाढ होउन सन 2008—09 मध्ये हे प्रमाण 724 लाख रू. एवढे प्रचंड वाढले म्हणजेच बॅकेने आपल्या कर्मच्याऱ्याच्या कार्यक्षमतेमध्ये सातत्याने वाढ केली आहे.
7.सारस्वत बॅकेचे निव्वळ अनुत्पादीत मत्ता आणि एकूण कर्जाचे प्रमाण सन 1997—98 मध्ये 6.35 टक्के होते हे प्रमाण अभ्यास कालावधी मधील सर्वाधीक होते. मात्र सन 1998—99 पासून प्रमाणात घट होताना दिसून येते सन 2004—05 पासून सारस्वत बॅकेने अनूत्पादीत कर्जाचे प्रमाण 0 टक्के राखले म्हणजेच बॅकेची सांपत्तीक स्थिती अत्यंत सक्षम होती म्हणजेच सारस्वत बॅकेची कर्ज वसूली क्षमता, पतपूरवढा क्षमता अत्यत सक्षम होती.

***संदर्भः—***

1.आर.एस.एन. पिल्लयी ॲण्ड भगवती. 2006 'मॅनेजमेंट अकौटिंग' एस.चांद ॲण्ड कंपनी लिमीटेड, रामनगर, न्यु. दिल्ली.
2.चोप्रा के. 1989. 'प्रॉफीट, प्रॉफिटॅबीलीटी ॲण्ड प्रोडक्टीव्हिटी इन पब्लीक सेक्टर बॅकिंग,' ए.बी.सी. पब्लिकेशन्स, जालंधर
3.किशोर राऊत ॲण्ड संतोष क. दास. 1980. 'कमर्शियल बॅक्स इन इंडिया', इंटर इंडिया, पब्लिकेशन्स, न्यु दिल्ली.
4.पानंदीकर सी.जी. 1975. 'बॅकिंग इन इंडिया', ओरिएंट लॉगमन लि. बॉम्बे.
5.सारस्वत सहकारी बॅक. 1991—92 ते 2008—09. 'वार्षिक अहवाल.
6.ूण्पदकपेंजंजण्बवउ